# कोल्हापूर जिल्ह्यातील मागासवर्गीयांच्या विकासातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहका-यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

**डॉ. श्रीधर भाऊसाहेब शिंदे** सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग मिरज महाविद्यालय, मिरज

---

**प्रास्ताविक**

शिक्षण हे सामाजिक बदलाचे महत्त्वाचे साधन आहे. ऐतिहासिक दृष्टिकोनातून एखाद्या समाजाचा शैक्षणिक विकास समजून घेणे म्हणजेच पर्यायाने त्या समाजामधील सामाजिक बदल समजून घेणे होय. भारतातील मागासवर्गीय समाज शिक्षणापासून आणि पर्यायाने विकासापासून वंचित राहिला. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अमूल्य योगदानामुळे अमुलाग्र सामाजिक बदल घडून आला. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांचा शैक्षणिक विकास ही एक चळवळ म्हणून केंद्रस्थानी ठेवली. आणि अशा प्रकारे ते ध्येय साध्य करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. परंपरेने गाव कुसाबाहेर ठेवलेल्या समाजाला स्वाभिमानाने जगायचे असेल तर प्रथम त्याला शिक्षण दिले पाहिजे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली उभी आहेत खर्ची घातली. यासाठी त्यांनी मुंबई येथे 1945 साली पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. त्यामुळे या संस्थेच्या शाळा महाविद्यालयांमधून दलित मुलांच्या बरोबर दलीतेत्तर मुले - मुली सुद्धा शिकू लागली. 1920 च्या दरम्यान मागासवर्गीयांना शिक्षण घेणे दुरापास्त असणाऱ्या समाजाच्या शिक्षणासाठी 1945 मध्ये स्वतंत्र संस्था काढून आधुनिक भारताच्या परिवर्तनाची फार मोठी स्वप्ने रंगवून

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही स्वप्ने प्रत्यक्षात उतरविल्याचे दिसते. फक्त शिक्षणाचा विचार मांडूनच ते गप्प बसले नाहीत तर शक्य त्या संधीचा फायदा घेऊन मागासवर्गीयांना शिक्षणाचे द्वार मुक्त करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वातंत्र्योत्तर भारताच्या निर्मितीचे प्रेरणास्थान ठरतात

**संशोधनाचा उद्देश:-**

प्रस्तुत संशोधनात कोल्हापूर जिल्ह्यातील मागासवर्गीयांच्या शिक्षणासंदर्भात

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या सहकाऱ्यानी केलेल्या योगदानाची चर्चा करणे, त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्यातील तत्कालीन मागासवर्गीय समाजाची स्थिती समजावून घेणे हा या संशोधनाचा मूळ उद्देश आहे.

**संशोधन पद्धती :-**

इतिहास हे एक सामाजिकशास्त्र आहे. म्हणून सामाजिक शास्त्रात वापरल्या जाणा-या पद्धतीचा वापर प्रस्तुत संशोधनासाठी केला आहे. सदर संशोशोधानाकरिता इतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रकाशित व अप्रकाशित लेखन साहित्य, दुय्यम प्रकाशित साधने यांचा वापर केला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे 1935 च्या घटनात्मक सुधारणेनंतर मुंबई विधानसभेवर सदस्य म्हणून नियुक्त झाले. यामुळे राजकारण घटना निर्मिती व इतर अनेक कामात गुंतल्यामुळे वैचारिक व विहित कार्य साध्य करण्यासाठी त्यांना सुशिक्षित व समाज परिवर्तनाची जाणीव असणाऱ्या सहकाऱ्यांची गरज होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक असे असामान्य व्यक्तिमत्व होते की, त्यांच्या कार्यामध्ये मदत करणाऱ्या िष्ठावान सहकाऱ्यांची त्यांनी शृंखलास तयार केली. त्यांच्यावर निष्ठा ठेवणारे आणि सक्रिय मदत करून त्यांचे कार्य पुढील टप्प्यात पोहोचविणारे अनेक सहकारी समर्थपणे त्यांच्या मदतीस आले. त्यामुळेच त्यांनी अल्पावधीतच फार मोठी गरुड झेप मागासवर्गीयांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये घेतली.

**एस के डिगे:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सोबत आणि त्यांच्या महानिर्वाणानंतर कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व ज्याने केले ते म्हणजे एस के डिगे होय. त्यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९१३ रोजी कोल्हापूरमध्ये झाला. प्राथमिक शिक्षण म्युनिसिपल शाळेमध्ये तर माध्यमिक शिक्षण विद्यापीठ हायस्कूल मध्ये झाले. उच्च शिक्षणासाठी राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यानंतर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीशी समरस झाले. आणि शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिले. १९५२ च्या निवडणुकांमध्ये शेड्युल कास्ट फेडरेशन ला फार मोठे यश आले होते. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ६ डिसेम्बर १९५६ मध्ये महानिर्वाण झाले. त्यानंतर रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली. दरम्यान 1957 मध्ये भारतात दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या. या निवडणुकीत 20 जानेवारी 1957 रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीने आपले उमेदवार म्हणून कोल्हापूर जिल्हा राखीव लोकसभेसाठी एस .के . डिगे व दा.म.शिर्के यांना उभे केले व ते विजयी झाले[१]

एस.के.डिगे यांनी कायदेमंडळामध्ये अनेक प्रश्नावर ती सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. डिगे यांनी राजकीय कामाबरोबरच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण कार्य केले कोल्हापुरातील नागोजीराव पाटणकर हायस्कूल, विद्यापीठा हायस्कूल, तारांराणी विद्यापीठ हायस्कूल या शिक्षण संस्थांमध्ये त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी केली. याशिवाय विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी त्यांचा अत्यंत जवळचा संबंध होता. नंतरच्या काळात दलित चळवळीचे केंद्र बनलेले मिस क्लार्क होस्टेलचे ते चेअरमन सुद्धा होते [२]

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा पक्ष व त्यांचे विचार कोल्हापूर जिल्ह्याच्या तळागाळतील जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम डिगे यांनी केले. सामाजिक आंदोलना बरोबर शैक्षणिक चळवळीची ही तेवढी समाजाला गरज आहे असे विचार विविध शैक्षणिक संस्था मधून त्यांनी व्यक्त केले व त्याप्रमाणे समाजाने कृती करावी अशी सूचनाही त्यांनी दिल्या अशा एस के डिगे या खासदाराचे १८ फेब्रुवारी १९६५ रोजी निधन झाले.

**दा.म. शिर्के:-**

कोल्हापूरमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी सुरू केलेल्या अस्पृश्यांच्या चळवळीत शिर्के हे एक सुशिक्षित अस्पृश्य तरुण होते. दरम्यान दत्तोबा संतराम पवार हे त्या चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावत होते. दत्तोबा पवार हे शाहू महाराजांचे अतिशय निष्ठावांत सहकारी होते. १९१७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दत्तोबा पवार यांचा परिचय झाला. दत्तोबा पवार यांनीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची छत्रपती शाहू महाराजांची भेट १९१९ मध्ये घडवून आणली. यामध्ये दत्तोबा पवार यांचे योगदान महत्त्वाचे आहे. याच दत्तोबा पवार यांनी दा. म. शिर्के यांची भेट छत्रपती शाहू महाराजांची घडवून आणली. त्याचप्रमाणे अनेक मागासवर्गीय पुढारी जे कोल्हापूर मध्ये काम करत होते, त्यांचीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी ओळख झाली. त्यामधील एक महत्त्वाचे नाव म्हणजे दा. म. शिर्के म्हणजेच दादासाहेब मल्हारराव शिर्के ३० डिसेंबर १९३९ रोजी कोल्हापूरमध्ये दलित प्रजा परिषद घेण्यात आली तिचे अध्यक्ष स्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देण्यात आले. या प्रजा परिषद निमित्त दसरा चौकातील शाहू महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले त्याप्रसंगी निपाणीचे

बी.एच. वराळे, गंगाराम कांबळे, मसुली गाडे, शांताराम सरनाईक, केरू बनगे, यशवंत सोळगावकर, दादासाहेब शिर्के इत्यादी उपस्थित होते.

त्यामुळे दा. म. शिर्के अल्पावधीतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कोल्हापूर मधील एक महत्त्वाचे सहकारी बनले. त्यांचा जन्म १९०७ मध्ये नागाव तालुका हातकणंगले जिल्हा कोल्हापूर येथे एका दलित बौद्ध कुटुंबात झाला. त्यांचे वडील छत्रपती शाहू महाराजांच्या दरबारात हुलस्वार म्हणून काम करीत होते. दादासाहेबांनी आपले शिक्षण राजाराम कॉलेज कोल्हापूर मधून पूर्ण केले. विद्यार्थी दशेतच त्यांच्यावरती डॉ. आंबेडकरांचा विचारांचा प्रभाव पडला होता.[३] कोल्हापूर संस्थान मध्ये दादासाहेब शिर्के इलाका पंचायत स्कूल बोर्ड कमिटी देवस्थान कमिटी त्याचबरोबर स्कूल कमिटीचे चेअरमन म्हणून काम पाहिले त्यांनी 'कोल्हापूर संस्थांनचा राज्यकारभार' 'इंग्रजी सत्ता व दलित जनता' 'करवीर सरकारचे दलित उद्धाराचे कानून'असे अनेक ग्रंथ लिहिले इ.स. सन १९२७ मध्ये,'गरुड' नावाचे वर्तमानपत्र काढले होते. त्याद्वारे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार केला १९४१ मध्ये मिरजेतील सत्याग्रहात डॉ. बाबासाहेबांच्या आदेशानुसार ते सक्रिय सहभागी झाले होते.[४] डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर १९५७ रोजी झालेल्या निवडणुकीमध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे अधिकृत उमेदवार म्हणून हातकणंगले मतदारसंघातून ते निवडून आले. आणि दा. म. शिर्के हे दलित समाजातील पहिले आमदार बनले. १९५७ ते १९६२ या काळात त्यांनी विधानसभेत विविध प्रश्नावरती सरकारचे लक्ष वेधले. त्यामध्ये कोल्हापुर मध्ये शिवाजी विद्यापीठाची स्थापना व्हावी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिवशी सार्वजनिक सुट्टी मिळावी असे महत्त्वाचे मुद्दे होते. कोल्हापूरमध्ये शैक्षणिक चळवळ वाढावी म्हणून संस्थान काळात ही आणि नंतर ही त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले त्यांचा मृत्यू २६ डिसेंबर १९८५ रोजी झाला.

**मा.ई. कुरणे:-**

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सोबत काम केलेले आणखीन एक महत्त्वाचे ज्येष्ठ नेते माधवराव ईश्वरा कुरणे म्हणजेच मा.ई. कुरणे होय. यांचा जन्म २ जानेवारी १९२२ रोजी हेरले तालुका हातकणंगले जिल्हा कोल्हापूर येथे झाला. प्राथमिक शिक्षण हेरले या गावी झाले. मॅट्रिक पर्यंत शिक्षण विद्यापीठ हायस्कूल कोल्हापूर आणि एम पी हायस्कूल इथून घेतले लहानपणापासूनच अन्यायाचा प्रतिकार करण्याचा स्वभाव त्यामुळे संघर्ष ठरलेला होता. हॉटेलवाला चहा देत नाही म्हणून त्याच्या कपबशा फोडल्या. त्या हॉटेलवर मोर्चा सुद्धा काढला डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आणि कुरणे यांची भेट १९४५ मध्ये झाली आणि त्यानंतर कोल्हापूर जिल्हा शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे सरचिटणीस म्हणून मा.ई.कुरणे यांची नियुक्ती झाली.

मा.ई.कुरणे यांनी अनेक सामाजिक आंदोलनात, राजकीय सहभाग दाखविला पण त्यांचे त्या काळातील शैक्षणिक काम फार महत्त्वाचे आहे १९५३ ते १९६२ पर्यंत ते जिल्हा लोकल बोर्डावरती व स्कूल बोर्डावरती कार्यरत होते. या काळात त्यांनी 750 मागासवर्गीय लोकांना प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरी लावली ही फार मोठी त्या काळातील क्रांती होती डॉ. आंबेडकर जयंतीला सुट्टी देणारा कोल्हापूर हा महाराष्ट्रातील दुसरा जिल्हा ठरला हे काम कुरणे यांनीच केले. रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष म्हणून ही त्यांनी काम केले. मा. ई. कुरणे आणखीन एका गोष्टीसाठी ओळखले जातात ते म्हणजे त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अनेक हाऊसिंग सोसायटी स्थापन केल्या, आणि मागासवर्गीयांना अल्प दरामध्ये जागा व घरे बांधून दिली. मा.ई. कुरणे यांच्या राजकीय सामाजिक कामापेक्षा त्यांनी केलेले शैक्षणिक काम दीर्घकाळापर्यंत लोकांच्या लक्षात राहील पश्चिम महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीच्या मर्यादा सांगताना ते म्हणतात पश्चिम महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांना सतत दुय्यम स्थान मिळाल्यामुळे कार्यकर्त्यांची ससेहोलपट झाली.[५]

**समारोप**:-

समाज बदलाचे महत्त्वाचे साधन म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला महत्वाचे स्थान दिले. मागासवर्गीय समाजाला शिक्षण घेण्याचा सल्ला त्यांनी दिला. या त्यांच्या कृतीशील विचारामुळे मागासवर्गीय समाज शिक्षण घेऊ लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे या समाजातील तरुण शिक्षण घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शैक्षणिक कामात मदत करू लागलेले दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाण नंतर कोल्हापूर मध्ये नंतरच्या पिढीनेही त्यांचा वारसा पुढे चालू ठेवलेला दिसतो.

**संदर्भ साधने**

१. कांबळे आर आर, 'रिपब्लिकन पक्ष उदय आणि विकास', निर्मिती संवाद, कोल्हापूर डिसेंबर २०१२, पृष्ठ ९९

२. Kurane C.P. life and work of Babasaheb Shirke unpublished M.Phil dessertation, Shivaji University Kolhapur, Dec. 1993, page133

3. पाटील भिकशेट, (संपादित), 'कोल्हापूरची मोठी माणसं', कल्पक प्रकाशन मंदिर, कोल्हापूर जानेवारी १९८३, पृष्ठ २२०

४. कित्ता

५.उपरोक्त, कुरणे. सी. पी., पृष्ठ १३३